RIGHT TO INFORMATION
सूचना का अधिकार

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन


**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, महाराष्ट्र राज्य,**
**कोकण भवन, सहावा मजला, नवी मुंबई ४०० ६१४.**

☎/ 🖷:-०२२,२७५७१३९१. Website:www.mahalfa.in E.Mail:ad.admin@mahalfa.in


क्रमांक स्था.१८/ब/न.क्र. ३५३(२)/तात्पु सेवाजेष्ठता सुची (२०%)/सन २०१९/आस्था-१/ २६० दिनांक :- 12 FEB 2019

प्रति,

सह संचालक,
स्थानिक निधी लेखापरीक्षा,
कोंकण/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपुर विभाग

विषय :- **स्थानिक निधी लेखापरीक्षा, संचालनालयातील व त्यांच्या अधिनस्त कार्यालयातील वरिष्ठ लेखापरीक्षक या संवर्गातील कर्मचाऱ्यांची दिनांक ०१.०१.२०१९ ची तात्पुरती राज्यस्तरीय (२०%) जेष्ठतासूची तयार करणे बाबत.**

स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय अंतर्गत कार्यरत वरिष्ठ लेखापरीक्षकांची दिनांक ०१.०१.२०१९ रोजीची तात्पुरती (Provisional) राज्यस्तरीय (२०%) जेष्ठता सूची तयार करण्यात आली असून ती या विभागाची वेबसाईट https://mahalfa.maharashtra.gov.in वर प्रसिध्द करण्यात येत आहे. सदरहु जेष्ठता सूची सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक एस.आर.व्ही.२०११/प्र.क्र.२८४/१२ दिनांक २१.१०.२०११ मधील सुचनांनुसार तयार करण्यात आली आहे. सदर जेष्ठता सूची तयार करताना महाराष्ट्र नागरी सेवा (जेष्ठतेचे विनियमन) नियमावली १९८२ मधील तरतुदींचा अवलंब करण्यात आला आहे.

त्यानुषंगाने आपणास कळविण्यात येते की, वरिष्ठ लेखापरीक्षकांची दिनांक ०१.०१.२०१९ रोजीची तात्पुरती (Provisional) राज्यस्तरीय (२०%) जेष्ठता सूची आपल्या विभागातील वरिष्ठ लेखापरीक्षक संवर्गातील सर्व कर्मचाऱ्यांच्या (रजेवर/प्रतिनियुक्तीवर असलेल्या कर्मचाऱ्यांसह) निदर्शनास आणावी. जेष्ठतासूची संदर्भात वरिष्ठ लेखापरीक्षक यांना आक्षेप हरकत सादर करावयाचे असल्यास या पत्राच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत सादर करण्याबाबत सूचित करावे. तसेच या संदर्भात वरिष्ठ लेखापरीक्षकांकडुन आक्षेप / त्रुटी याबाबत प्राप्त झालेल्या निवदेनातील मुद्दयांबाबतची माहिती विभागातील अभिलेख्यानुसार तपासून आपले अभिप्रायासह व आवश्यक कागदपत्रांसह निवेदने त्यापुढे सात दिवसात संचालनालयास पाठवावीत. विहित कालावधीत आक्षेप/माहिती प्राप्त न झाल्यास जेष्ठता सूची मध्ये नमूद केलेले तपशिल योग्य असल्याचे गृहित धरुन अंतिम जेष्ठता सूची प्रसिध्द करण्यात येईल. त्यांनंतर कोणताही आक्षेप/अर्जाचा विचार केला जाणार नाही.

**(शुभांगी पाटोळे)**
सहसंचालक
स्थानिक निधी लेखापरीक्षा,
नवी मुंबई